SUPPLEMENT

TO THE

# BOMBAY GOVERNMENT GAZETTE.

Published by Authority.

WEDNESDAY, 26th FEBRUARY 1862.

## PROCEEDINGS OF THE LEGISLATIVE DEPARTMENT, BOMBAY.

The following extract from the Proceedings of His Excellency the Governor of Bombay in Council, assembled for the purpose of making Laws and Regulations, is hereby published for the information of all whom it may concern :—

*22nd February* 1862.

The Council of the Governor of Bombay for the purpose of making Laws and Regulations met according to adjournment.

*PRESENT*:—

The Honorable Mr. Frere,
The Honorable Mr. Westropp,
The Honorable Mr. Tristram,
The Honorable the Nawab of Savanoor,
The Honorable Mr. Rustomjee Jamsetjee Jejeebhoy,
The Honorable Mr. Madhoorow Vittul Vinchoorkur,
The Honorable Mr. Juggonath Sunkersett,
The Honorable Mr. Premabhai Hemabhai,
And the Secretary and Deputy Secretary.

The Honorable Mr. Frere being the only ordinary Member of Council present, presided in the absence of the Governor.

The President informed the Council that His Excellency the Governor in Council had been pleased to appoint Mr. L. H. Bayley, Deputy Secretary to the Government of Bombay in the Legislative Department.

Mr. Bayley took the usual oath.

The PRESIDENT said that the first subject for the consideration of the Council was to consider further the letter from the Government of India, No. 214, dated the 13th January, desiring certain amendments to be made in the Rules of the Council.

Mr. WESTROPP stated he had prepared new Rules; that among other provisions he proposed that every Bill when read a first time should be referred to a Select Committee, and that the Committee might report during the interval between the sessions; but, as he would suggest that the Rules should be printed and circulated, it would be unnecessary to state the provisions in detail on the present occasion.

The PRESIDENT proposed that the Rules be printed and circulated.

*Agreed to.*

The PRESIDENT stated that they were now to consider a "Bill for bringing under the Regulations and Acts certain lands ceded by His Highness the Guicowar for Railway purposes," and he moved that the Bill be read a second time.

The NAWAB OF SAVANOOR stated that, in his opinion, the Council should not legislate on the subject of Railroads piecemeal. That there should be one general Act to bring under the Laws all lands that had been or might be ceded by Independent Chiefs or Jageerdars.

The PRESIDENT supported the necessity for the Bill in its present shape.

Mr. WESTROPP did the same.

Mr. JUGGONATH SUNKERSETT saw no objection to the Bill.

Mr. RUSTOMJEE JAMSETJEE JEJEEBHOY agreed to the Bill.

Mr. PREMABHAI HEMABHAI moved, as an amendment, that the villages mentioned in the Schedule, and numbered from 23 to 32, both inclusive, be annexed to the Ahmedabad Zillah to which they were adjacent, and the rest to the Surat Zillah.

Mr. FRERE explained that, if the Resident at Baroda was appointed a Magistrate, he could try offences committed in the neighbourhood of Baroda, so that few cases would be sent either to Ahmedabad or Surat; and that it was advisable, to prevent any question of jurisdiction, that all the lands should be annexed to one Zillah.

Mr. RUSTOMJEE JAMSETJEE JEJEEBHOY stated he was in favour of the amendment.

On the amendment being put to the vote, there being two in favour of the amendment, and five against it, the amendment was lost.

The Bill was read by the Duputy Secretary a second time, and passed.

The PRESIDENT stated that the next subject for consideration was a "Bill for extending the powers of Municipal Commissioners appointed under Act XXVI. of 1850."

The Deputy Secretary read the Bill.

Mr. TRISTRAM said that the Bill was brought forward by Mr. Reeves who was unable to attend to-day in consequence of illness.

Mr. TRISTRAM mentioned some of the Provisions of the Bill, and argued in their favour. There was recently a case at Poona which illustrated his remarks, and proved the necessity for some such provisions as are made in this Bill. He concluded by moving that the Bill be read a second time.

Mr. WESTROPP thought the Bill ought not to pass in its present form. It gave too great a latitude to Government. He agreed in thinking that, in the case of any dereliction of duty on the part of the Municipal Commissioners in respect to sanitary arrangements, power should

be given to Government to enforce the performance of the Act; but that that power should only be allowed to Government in the cases of overruling necessity.

He called attention to the proviso at the end of the 2nd Section, and thought it preposterous to make the Commissioners individually and personally responsible, because they happened to differ in opinion from the Government of the day; on the other hand, the 9th Section of Act XXVI. of 1850 was a perfectly fair one, because, under it, a penalty could only be inflicted where there was *mala fides*.

He thought the words in the 2nd Section "other similar works of utility" ambiguous. He proposed that the Schools, &c. should be under the control of Government; and that unless two thirds of the members of the whole body of Municipal Commissioners agreed, and not merely a majority of those members present at a meeting, no expenditure should be allowed. He concluded by proposing that the words "other similar works of utility" be struck out wherever they occurred in the preamble or Bill.

Mr. Juggonath Sunkersett asked whether the Act would sanction support being given to Dispensaries, Hospitals, and Schools already in existence out of the taxes raised under the Act.

Mr. Westropp said that, as the words were "to apply the said taxes to the construction and support," and not "construction or support," the Act would only apply to Dispensaries, &c. hereafter to be erected.

It was then put to the vote that the words "and other similar works of utility to the inhabitants of," in the 2nd Clause of the preamble, and the words "or similar works of utility," in the 4th Clause of the preamble, be struck out.

*Carried unanimously.*

Mr. Westropp proposed that the word "and" be inserted between the words "Hospitals" and "Schools" in the 2nd Clause of the preamble, and the word "in" before the words "the said Town and Suburb" in the last line of that clause.

*Carried unanimously.*

Mr. Westropp proposed that the words "in certain cases" be inserted in the second line of the 3rd Clause of the preamble between the words "should" and "have."

*Carried unanimously.*

Mr. Westropp then proposed the following amendments in the 1st Clause of the Bill :—

That the word "or" be inserted between the words "Dispensary" in the fourth line, and "school" in the fifth line, and that the words following the word "school" be left out, and the following inserted :—"If such application be adopted by a majority consisting of two-thirds of the Members of the whole body of the Municipal Commissioners of the Town or Suburb : provided always, that it shall not be competent to the said Commissioners to expend annually the said taxes to an extent exceeding 25 per cent. of the annual revenues of the Municipality for the purposes last aforesaid, or to extend any portion thereof for such purposes without the approval of the Governor in Council."

The above amendments were put, and *carried unanimously.*

Mr. Westropp proposed the following amendments in the 2nd Section of the Bill :—

That the words "necessary" and "Act" be omitted wherever they occur in this Section, and that after the word "duty" in the ninth line the following be inserted, "falling within the scope of this Act or of Act XXVI. of 1850, and indispensable in the opinion of the Governor in Council for the public health or safety."

That between the words "or" and "duty" in the twelfth line, and between the same words in the 17th line, the words "perform the said" be inserted.

The amendments were put, and *carried unanimously.*

Mr. Westropp then proposed the following amendments :—

To insert the words "out of the said Municipal Funds" between the words "Municipal Commissioners" and "it" in the 21st line, and to strike out all that follows the word "to" in the 22nd line of the same Section, and to substitute the following, "recover the amount thereof by suit in the Civil Court or Courts having jurisdiction in the said Town or Suburb, and the costs of the said suit from the said Municipal Commissioners or any one of them, and the said Municipal Commissioners may, out of the accruing municipal rates, reimburse themselves in any sum or sums which they or any one of them may be compelled to pay to the Governor in Council for the expenses of the execution of such work or performance of such duty, but not the costs of any such suit as aforesaid; and the said suit may be instituted in the name of the Secretary of State for India in Council, and no Municipal Commissioner shall be exempt from responsibility in such suit by reason of his having resigned his appointment after the order of the Governor in Council for execution of the work or performance of the duty was issued to the said Commissioners."

The amendments were put, and *carried unanimously.*

Mr. Westropp then moved that the Bill, as amended, be reprinted, and circulated to the Council, and be reconsidered at their next meeting.

*Agreed to.*

The President said the next subject was to consider a "Bill to amend Act XI. of 1843." The Bill had been read at the last meeting, and he proposed that it now be referred to a select Committee, consisting of Mr. Reeves and Mr. Madhowrow Vittul Vinchoorkur, to report on it at the next meeting.

*Agreed to.*

The President then proposed that the next subject for consideration, a "Bill for extending the jurisdiction of the Native subordinate Civil Courts to the same as that exercised by similar Courts on the other side of India," which had also been read at the last meeting, be referred to a select Committee.

Mr. Juggonnath Sunkersett moved that Mr. Frere, Mr. Westropp, and Mr. Madhowrow Vittul Vinchoorkur form the Committee, and to report at the next meeting.

*Agreed to.*

The President said the next subject for consideration was a "Bill for regulating the establishment of Markets," brought in by Mr. Reeves. He moved it to be read a first time.

The Deputy Secretary read the Bill.

*A Bill for Regulating the Establishment of Markets.*

Preamble.

Whereas the establishment of new Markets in the neighbourhood of places where Markets have been previously established leads to disputes between the owners of the lands on which such new and previously established Markets are held, and such disputes not unfrequently occasion breaches of the peace, and serious inconvenience to the frequenters of such Markets; it is enacted as follows :—

No new Market to be established without permission of Magistrate.

I. After the passing of this Act, no person shall establish a new Market, without permission, in writing, from the Magistrate of the District. If any person shall attempt to establish a new Market without such licence, he shall, on conviction by the Magistrate, be subject to a fine not exceeding two hundred Rupees.

II. When any person desires to establish a new Market, he shall make application in writing to the Magistrate. The application shall specify the name of the place at which it is proposed to establish such new Market; the days on which it is to be held; the name of the place where the nearest existing Market is held, and the days on which it is held; the distance, in English miles, between the two places, and the reasons of the applicant for desiring to establish the new Market.

Application for permission.

III. On receipt of the application the Magistrate shall issue a Proclamation, stating the desire of the applicant to establish a Market at the place named by him, and the days on which it is proposed to be held, and calling upon any person who may have any objection to the establishment of the market to state his objection in writing within six weeks from the date of the Proclamation. The Proclamation shall be affixed in a conspicuous place in the Village or Town in or near to which it is proposed that the new Market shall be held; and a copy of the same shall be affixed at the Police Station within the jurisdiction of which the Village or Town is situate, and in the Court of the Magistrate. If it shall appear that any existing Market is held within a distance of four miles from the place where it is proposed that the new Market shall be established, the Magistrate shall cause a Notice to the effect of the Proclamation to be served upon the owner of the land where such existing Market is held. The Proclamation and Notice (if any) shall be issued and served at the expense of the applicant.

Issue of Proclamation and Notice.

IV. If, within the time specified in the Proclamation and Notice (if any) no objection is preferred to the establishment of the proposed Market, the Magistrate shall pass an order permitting it to be established. If, within the time specified, any objection is preferred, the Magistrate shall inquire into the objection, and pass such order as may appear proper in the circumstances of the case.

Magistrate's order.

If objection be made.

V. If, within six months from the passing of this Act, any objection shall be preferred to the Magistrate in respect of any Market which has been newly established within a period of two years before the passing of this Act, the Magistrate shall inquire into the objection; and if it shall appear that such new Market has been establised within a distance of four miles from any previously existing Market, and that the establishment of the new Market has been the cause of disturbances or other inconvenience to the people of the neighbourhood, the Magistrate may, if he think necessary, change the days upon which such new Market is held, or, at his discretion, order that it be discontinued.

Markets established two years before the passing of this Act.

VI. Every order passed by a Magistrate under this Act shall be open to appeal to the Commissioner of Police, and the order of the Commissioner, subject to the control of the local Government, shall be final.

Appeal.

VII. Every person who shall contravene any order duly passed under this Act, shall be liable to a fine not exceeding two hundred Rupees.

Penalty for contravening order.

VIII. All the provisions of this Act relative to the establishment of new Markets shall be applicable also to the establishment of new Fairs.

Act applicable to the establishment of new Fairs.

The President moved that the Bill be referred to a select Committee, consisting of Mr. Reeves, Mr. Juggonath Sunkersett, and the Nawab of Savanoor, to report at the next meeting but one.

*Agreed to.*

The President moved that a "Bill for the preservation of the Bhagdaree Tenure" be read a first time.

The Bill was read by the Deputy Secretary.

*Draft.*

Whereas it has been found that the permanence of the tenure known as the Bhagdaree tenure, which has existed from time immemorial in certain parts of the Presidency of Bombay, is endangered by the increasing practice of attachment and sale by civil process of the homesteads and building sites appertaining to, and forming integral parts of, the constituted Bhags, or the recognised sub-divisions of such Bhags, in Bhagdaree Villages; and whereas it is undesirable that the said ancient tenure should be subjected to destruction by the action of the Civil Courts; it is therefore enacted as follows:—

I. No portion of a Bhag in any Bhagdaree Village other than a recognized sub-division of such Bhag shall, from and after the passing of this Act, be liable to seizure, sequestration, attachment, or sale by the process of any Civil Court; and no process of such Court shall be enforced so as to cause the dismemberment from any such Bhag, or recognized sub-division, of any homestead, building site, or premises forming an integral part thereof.

II. It shall be lawful for the Collector of the District in which any Bhagdaree Village is situated, though not a litigating party, to represent, when necessary, to any Civil Court having jurisdiction in the case, any objection which may exist to the attachment, seizure, or sale of any land or premises to which this Act may be applicable; and it shall be lawful for such Court to pass such order thereon as shall be equitable and just, and such order shall be appealable in the same manner as a decree of the Court in which it is made.

The President moved that the Bill be referred to a select Committee, consisting of Mr. Reeves, Mr. Westropp, and Mr. Premabhai Hemabhai, to report at next meeting but one.

*Agreed to.*

The President then adjourned the Meeting till Saturday, the 1st March, next at 11 A.M.

*By order of His Excellency the Governor of Bombay in Council,*

LYTTELTON H. BAYLEY,

Deputy Secretary to Government.

*Bombay Castle, 22nd February* 1862.

# मुंबई येथील लेजिस्लेटिव डिपार्टमेंटाचें प्रोसिडिंग.

कायदे व कानूं करण्यासाठीं बंदेगान आलीनवाब मुस्ततात्र हजरत आनरबल् गवरनर साहेब बाहादूर जंजिरे मुंबई यांचें कौन्सिल भरलें होतें त्यावेळीं काम चालले त्यांतील खालीं लिहिलेला उतारा सर्वांस जाहीर होण्यासाठीं प्रसिध्ध केला आहे.

तारीख २२ वी माहे फेब्रुआरी सन १८६२.

कायदे व कानूं करण्यासाठीं मुंबईचे गवरनर साहेबांचे कौन्सिलाची सभा आजच्या दिवसापर्यंत तहकूब केली होती त्या प्रमाणें आज पुन: भरली.

हजर.

आनरबल् फ्रीयर साहेब.
आनरबल् चेस्लूप साहेब.
आनरबल् रिट्स्सन साहेब.
आनरबल् नवाब साहेब सावनूर येथील.
आनरबल् रस्तमजी जमसेटजी जीजीभाई साहेब.
आनरबल् राव बाहादूर माधवराव विठ्ठल विंचुरकर.
आनरबल् जगंनाथ शंकरशेट साहेब.
आनरबल् सेट प्रेमाभाई हेमाभाई.
आणि सेक्रेटारी साहेब व डेपुटी सेक्रेटारी साहेब.

कौन्सिलाचे आर्डिनरी मेंबरांपैकीं आनरबल् फ्रीयर साहेब मात्र हजर होते सबब ते, गवरनर साहेब आले नव्हते ह्मणून प्रेसिडेंट झाले.

नंतर प्रेसिडेंट साहेबानीं कौन्सिलास जाहीर केलें कीं आलीज्या गवरनर साहेब बाहादूर दर इजलास कौन्सिल याणीं लिटल्टन् हार्ली ओक बेली साहेब यांस कायदे करण्याचे खात्यांत मुंबई सरकारचे डेप्युटी सेक्रेटारी नेमले आहे.

मग बेली साहेबानी मामुल प्रमाणे शपथ केली.

त्यानंतर प्रेसिडेंट साहेब ह्मणाले कीं आज कौन्सिलांत ज्या प्रकरणांचा विच्यार व्हावयाच्या त्यांतील पहिलें प्रकरण खालीं लिहिल्या प्रमाणे आहे ह्मणजे कौन्सिलाचे नियमांत कांहीं फेरफार करण्याविषयीं इंडिया सरकाराकडून १३ वे ज्यान्युआरी १८६२ चें २१४ वे नंबराचें पत्र आलें आहे त्याचा आणखी विच्यार करणें आहे.

आनरबल् चेस्लूप साहेब ह्मणाले कीं आह्मी नवीन नियम तयार केले आहेत त्यांत आणखी एक असा नियम ठरविला आहे कीं प्रत्येक आक्टाचा मसुदा पहिले वेळीं वाचला ह्मणजे तो सिलेक्ट कमिटीकडे सोंपावा आणि त्या कमिटीने त्या मसुद्याबाबद सेशन संपल्यानंतर दुसरें सेशन भरे तोंपर्यंत दरमियानच्या वेळांत रिपोर्ट करावा. परंतु नियम छापून सर्वांकडे पाठवावे असें आमचें

ह्मणणें आहे.—— यास्तव आतां त्यांतील सर्व ठराव तपशीलवार सांगणें जरूर नाहीं.

प्रेसिडेंट साहेब ह्मणाले कीं नियम छापून सर्वांकडे पाठवावे.

ही गोष्ट सर्वांनी कबूल केली.

प्रेसिडेंट साहेब ह्मणाले कीं "गायकवाड सरकारानी लोखंडी सडकेच्या कामासाठीं कांहीं जमिनी दिल्या आहेत त्यांस कायदे व आक्ट लागू करण्याविषयींचे आक्टाचे मसुद्या" चा आतां आपणास विचार करणें आहे. आणि आतां तो मसुदा दुसरे वेळीं वाचावा असें आमचें ह्मणणें आहे.

आनरबल सावनूरकर नवाब साहेब ह्मणाले कीं लोखंडी सडकांबाबद घडी घडी कायदे करणें योग्य नाहीं संस्थानी किंवा जाहागीरदार यांकडून ज्या जमिनी लोखंडी सडकांसाठीं दिल्या असतील किंवा पुढें देण्यांत येतील त्या सर्वांस कायदा लागू करण्याविषयीं एकच सामान्य आक्ट असावा.

हाल्लीं जसा मसुदा आहे त्याप्रमाणेंच आक्ट करणें अवश्य आहे असें प्रेसिडेंट साहेब ह्मणाले.

आनरबल वेस्ट्राप साहेबांनीही त्याप्रमाणेंच ह्मटलें.

आनरबल जगंनाथ शंकरशेट साहेब ह्मणाले कीं या मसुद्याबाबद आह्मास कांहीं हरकत दिसत नाहीं.

आनरबल रुस्तमजी जमसेटजी जीजीभाई साहेबानी मसुदा कबूल केला.

आनरबल सेट प्रेमाभाई हेमाभाई ह्मणाले कीं या मसुद्याचे परिशिष्टांत लिहिलेले २३ वे नंबरापासून ३२ वे नंबरापर्यंतचे गांव अमदाबाद जिल्ह्याजवळ आहेत ते त्या जिल्ह्यांत दाखल करावे व बाकीचे सुरत जिल्ह्यांत दाखल करावे असा मसुद्यांत फेरफार करावा.

आनरबल फ्रीयर साहेब ह्मणाले कीं बडोदें येथील रेसिडेंट साहेबास माजिस्ट्रेट नेमले तर बडोद्यानजीक गुन्हे होतील त्यांचा इनसाफ ते करतील मग थोडके मुकदमे अमदाबादेस किंवा सुरतेस पाठविण्यांत येतील. आणि हुकुमती विषयीं तकरार न पडावी याकरितां सर्व जमिनी एके जिल्ह्यांत दाखल कराव्या हें योग्य आहे.

आनरबल रुस्तमजी जमसेटजी जीजीभाई साहेब ह्मणाले कीं मसुदा सदई प्रमाणे फिरवावा असें आमचें मत आहे.

मसुदा सदई प्रमाणे फिरवावा किंवा न फिरवावा याबाबद अनुमतें घेतलीं तेव्हां फिरविण्याविषयीं दोन अनुमतें पडलीं व न फिरविण्याविषयीं ५ अनुमतें पडलीं यामुळें फिरविण्याचें ह्मणणें नाकबूल झालें.

मग मसुदा डेपुटी सेक्रेटारी साहेबांनी दुसरे वेळीं वांचून कायम केला.

नंतर प्रेसिडेंट साहेब ह्मणाले कीं सन १८५० चे २६ वे आक्टा अन्वयें नेमलेले म्युनिसिपल

कमिशनरांचे अधिकार वाढविण्याविषयींचे आक्टाचे मसुद्याबाबद आतां विच्यार करणें आहे.

डेपुटी सेक्रेटारी साहेबानीं तो मसुदा वाचला.

आनरबल ट्रिस्ट्राम साहेब ह्मणाले कीं हा मसुदा आनरबल रीवझ साहेबानी गुजारला होता आणि ते आजारी असल्यामुळें त्यांच्यानें आज येववत नाहीं.

नंतर त्या मसुद्यांतील कांहीं ठराव वाचून दाखवून त्याप्रमाणे ठरविण्याविषयीं आपले मतों ज्या सबबी होत्या त्या आनरबल ट्रिस्ट्राम साहेबानी सांगितल्या. आपले बोलण्याचे प्रसंतरास पुण्यांतील आलीकडला एक दाखला दिला आणि मसुद्यांत ठराव केले आहेत त्यांप्रमाणें ठरविणें अवश्य आहे असें त्या दाखल्यावरून शाबीत करून दाखविलें. सदर्हू मसुदा दुसरे वेळीं वाचावा असें बोलून त्याणी आपलें संभाषण पुरें केलें.

आनरबल वेस्ट्राप साहेब ह्मणाले कीं हा मसुदा हाल्लीं आहे तसाच कायम करूं नये यांत सरकारास फारच मोकळीक दिली आहे. शहर सुधारण्याचे बंदोबस्तांत कोणतेही कामाची म्युनिसिपल कमिशनरानी हयगय केली असतां तें काम करविण्याचा अधिकार सरकारास द्यावा हें ठीक आहे. परंतु फारच अवश्य असेल तशी प्रसंगी मात्र सदर्हू प्रकारचा अधिकार सरकारास असावा.

दुसरे कलमाचे शेवटील ठराव वाचून दाखवून ते असें ह्मणाले कीं सरकारचे मताहून कमिशनरांचें मत भिन्न पडल्यामुळेंच त्यांपैकीं प्रत्येकास जातीनिशीं जवाबदार करणें ही मोठी विपरीत गोष्ट आहे. सन १८५० चे २६ वे आक्टांतील ९ वे कलमांत ठराव आहे तो वाजवीच आहे कांकीं लबाडी झाली असतां मात्र दंड करण्याविषयीं त्या कलमांत ठराव आहे.

ते आणखी असें ह्मणाले कीं "तशींच उपयोगी इतर कामें" हे शब्द दुसरे कलमांत लिहिले आहेत त्याचा अर्थ मोघम आहे. ते ह्मणाले कीं शाळा वगैरे सरकारचे ताब्यांत असाव्या आणि सर्व म्युनिसिपल कमिशनरांपैकीं दोन तृतीयांशांचें मत असल्यावांचून कोणताही खर्च करूं नये. एकादी सभा होईल तींत म्युनिसिपल कमिशनर हजर असतील त्यांपैकीं बहुतांचें मत पडलें असतां तेवढ्यावरूनच खर्च करूं नये. शेवटीं ते असें ह्मणाले कीं उद्देशांत किंवा मसुद्यांत जेथें जेथें "तशींच उपयोगी इतर कामें" हे शब्द असतील तेथून तेथून ते काढून टाकावे.

आनरबल जगंनाथ शंकरशेट साहेबानीं असें पुशिलें कीं दवाखाने व इस्पितालें व शाळा हाल्लीं आहेत त्यांचे खर्चास आक्टावरून वसूल केलेले करांतून मदत करण्याचा अधिकार या आक्टावरून होतो कीं नाहीं.

यावर आनरबल वेस्ट्राप साहेब ह्मणाले कीं "सदर्हू करांचा ऐवज कामें बांधण्याकडे व खर्च चालविण्याकडे लावावा" असे शब्द आक्टांत आहेत आणि "बांधण्याकडे किंवा खर्च चालविण्याकडे लावावा" असे शब्द नाहींत यामुळें दवाखानें वगैरे पुढें बांधण्यांत येतील त्यांस मात्र हा आक्ट लागू होईल असें होतें.

उद्देशाचे २ रे रकमेंत "आणि राहाणारांचे उपयोगी तसेंच इतर काम" हे शब्द आहेत ते आणि उद्देशाचे ४ थे रकमेंत "किंवा तशींच उपयोगी इतर कामें" हे शब्द आहेत ते काढून टाकण्याविषयीं अनुमतें घेतलीं.

तेव्हां काढून टाकावे या प्रमाणें सर्वमतें ठराव झाला.

आनरबल् वेस्राप साहेब ह्मणाले कीं उद्देशाचे दुसरे रकमेंत "इस्पिटालें" व "शाळा" हे शब्द आहेत त्यांमध्यें "व" हा शब्द घालावा आणि त्याच रकमेच्या शेवटीं "गांव किंवा गांवा बाहेरील वस्ती" या शब्दांस "आंत" हा प्रत्यय लावावा.

सदर्हू प्रमाणें सर्व मतें ठराव झाला.

नंतर आनरबल वेस्राप साहेब ह्मणाले कीं उद्देशाचे तिसऱ्या रकमेंत "करविण्याचा अधिकार" या शब्दां पुढें "कांहीं प्रसंगीं" हे शब्द घालावे.

त्या प्रमाणे सर्व मतें ठराव झाला.

मग आनरबल् वेस्राप साहेब म्हणाले कीं मसुद्याचे १ले रकमेंत खालीं लिहिलेले फेरफार करावे.

म्हणजे "दवाखाने" व "शाळा" या शब्दांमध्यें किंवा हा शब्द घालावा. आणि "शाळा" या शब्दापुढील शब्द काढून टाकावे व त्या बद्दल खालीं लिहिलेले शब्द घालावे म्हणजे "गांवाचे किंवा गांवा बाहेरील वस्तीचे सगळे म्युनिसिपल कमिशनरांपैकीं दोन तृतीयांशांनी सदर्हू प्रमाणे खर्च करण्याचें कबूल केलें तर. परंतु असें ठरविलें आहे कीं सदर्हू करांचा ऐवज दरसाल वसूल होईल त्याचे चतुर्थांशाहून ज्यास्ती ऐवज सदर्हू कामाकडे दरसाल खर्च करण्याचा अधिकार सदर्हू कमिशनरांस नाहीं अथवा सदर्हू कामाकडे चतुर्थांशांतून कोणताही भाग गवरनर इन् कौन्सिलाची मंजूरी घेतल्यावांचून खर्च करण्याचा अधिकार नाहीं."

सदर्हू फेरफारा विषयीं अनुमतें घेतलीं तेव्हां ते फेरफार सर्व मतें कबूल झाले.

वेस्राप साहेब म्हणाले कीं मसुद्याचे २रे कलमांत खालीं लिहिल्या प्रमाणे फेरफार करावे.

"जरूरीचें" व "कृत्य" हे शब्द या कलमांत जेथे जेथें असतील तेथून तेथून ते काढून टाकावे आणि पांचवे ओळींत "कर्म" या शब्दा पुढें खालीं लिहिले शब्द घालावे म्हणजे "या आक्टांत सांगितलेले प्रकारचे किंवा सन १८५० चे २६ वे आक्टांत सांगितलेले प्रकारचे आणि लोकांचे आरोग्यास किंवा बऱ्याभास अवश्य आहे असें गवरनर इन् कौन्सिलास वाटेल तें" हे शब्द घालावे.

पांचवे ओळींतील "किंवा" व "कर्म" या शब्दापुढें व ७ वे ओळींतील त्याच शब्दापुढें "करण्याविषयीं" हे शब्द घालावे.

सदर्हू फेरफारा विषयीं अनुमतें घेतलीं तेव्हां ते फेरफार सर्व मतें कबूल झाले.

नंतर खालीं लिहिलेले फेरफार करावे म्हणून आनरबल् वेस्राप साहेबानी म्हटलें.

त्याच कलमाचे ९ व्या ओळींत "खर्च" व "म्युनिसिपल कमिशनर" या शब्दांमध्यें "शहर सुधारण्याचे ऐवजांतून" हे शब्द घालावे. आणि १० वे ओळींतील "तर" ह्या शब्दापुढील मजकूर काढून टाकून त्या बद्दल खालीं लिहिलेला मजकूर दाखल करावा म्हणजे "सदर्हू गांवांत किंवा गांवा बाहेरील वस्तींत ज्या दिवानी कोर्टाची किंवा कोर्टांची हुकमत चालत असेल त्या कोर्टांत फिरयाद करून तो खर्च-

चा ऐवज वसूल करण्याचा अधिकार आणि सदर्हू फिरयादीचा खर्च सदर्हू म्युनिसिपल कमिशनराजवळून किंवा त्यांपैकीं कोणा एकाजवळून वसूल करण्याचा अधिकार गवरनर इन् कोंन्सिलास आहे. आणि सदर्हू प्रकारचें काम बांधण्यासाठीं किंवा सदर्हू प्रकारचें कर्म करण्यासाठीं खर्चाचा ऐवज गवरनर ईन् कौन्सिलास म्युनिसिपल कमिशनरास किंवा त्यांपैकीं कोणा एकास द्यावा लागला असेल तो म्युनिसिपल कर जमा होईल त्यांतून वसूल करण्याचा अधिकार त्यास आहे. परंतु सदर्हू प्रकारचे फिरयादीचा खर्च वसूल करण्याचा अधिकार नाहीं. आणि सदर्हू प्रकारची फिरयाद, हिंदुस्थानाचे स्टेट्र सेक्रेटारी इन कौन्सिल यांचे नावाने करावी आणि सदर्हू काम बांधण्या विषयीं किंवा कर्म करण्या विषयीं सदर्हू प्रकारचे कमिशनरास गवरनर इन कौन्सिलाने हुकूम केल्यानंतर कोणी म्युनिसिपल कमिशनराने आपले हुद्याचा राजीनामा दिल्याचे सबबने त्याजवरील सदर्हू प्रकारचे मुकदम्यांतील जबाबदारी नाहींशी होते असें समजू नये.

ह्या फेरफारां विषयीं अनुमतें घेतलीं तेव्हां ते सर्वमतें कबूल झाले.

मग आनरबल वेस्ट्राप साहेब म्हणाले कीं हा मसुदा सुधारला आहे तसा पुनः छापवून कौन्सिलाचे मेंबरांकडे पाठवावा त्याचा पुढले सभेंत पुनः विच्यार करावा.

ही गोष्ट सर्वांनी कबूल केली.

प्रेसिडेंट साहेब म्हणाले कीं आतां "सन १८४३ चा ११ आक्ट सुधारण्या विषयींचें आक्टाचे मसुद्याचा" विच्यार करणें आहे. हा मसुदा गेल्या सभेंत वाचला होता आणि आनरबल रीव्ह्ज साहेब व आनरबल राव बाहादूर माधवराव विठ्ठल विंचुरकर या दोघांची सिलेक्ट कमिटी नेमून त्या कमीटीस तो सोंपावा व त्या बाबद पुढले सभेंत रिपोर्ट करण्याविषयीं त्यांस सांगावें.

ही गोष्ट सर्वांनी कबूल केली.

प्रेसिडेंट साहेब म्हणाले कीं "प्रिन्सिपल सदर अमीन व सदर अमीन व मुनसफ याचे कोर्टास हिंदुस्थानाचे इतर भागांत जी हुकुमत आहे त्या प्रमाणे या प्रेसिडेन्सींतील तशेच कोर्टास आणखी हुकम देण्याविषयींचे आक्टाचे मसुद्याचा" आतां विच्यार करणें आहे. हा मसुदा गेल्या सभेंत वाचला होता तो आतां सिलेक्ट कमीटीकडे सोंपावा.

आनरबल जगंनाथ शंकरशेट साहेब म्हणाले कीं या कमीटींत आनरबल फ्रीयर साहेब व आनरबल वेस्ट्राप साहेब व आनरबल राव बाहादूर माधवराव विठ्ठल विंचूरकर हे असावे व त्यांणी त्या बाबद दुसरे सभेंत रिपोर्ट करावा.

ही गोष्ट सर्वांनी कबूल केली.

प्रेसिडेंट साहेब म्हणाले कीं "बाजार स्थापण्या बाबद नियम ठरविषयींचे आंक्टाचे मसुद्याचा आतां विच्यार करणे आहे. हा मसुदा आनरबल रीव्ह्ज साहेबानी गुजारला आहे. हा मसुदा आतां पहिले वेळीं वाचावा.

मग डेपुटी सेक्रेटारी साहेबानी मसुदा वाचला तो येणे प्रमाणें:—

# बाजार स्थापण्या बाबद नियम ठरविण्याविषयींचे आक्टाच्या मसुदा.

उद्देश. ज्या जागीं बाजार पूर्वी स्थापले असतील त्यांचे शेजारीं नवे बाजार स्थापले असतां ते नवे व पूर्वी स्थापलेले बाजार ज्या जागीं भरतात त्या जागांचे मालकांचे दरमियान तकरारी पडतात, आणि त्या तकरारीं पासून वारंवार फिसाद होत्ये, व त्या बाजारांत जाणारे येणारे लोकांस मोठी अडचण पडत्ये यास्तव, खालीं लिहिल्याप्रमाणें ठरविलें आहे :—

माजिस्ट्रेटाचे परवानगी वांचून नवा बाजार स्थापूं नये. १ हा आक्ट ठरल्या नंतर नवीन बाजार स्थापणे तो जिल्ह्याचे माजिस्ट्रेटाची लेखी परवानगी घेतल्यावांचून कोणी स्थापूं नये. कोणी मनुष्य सदर्हू प्रकारचे परवानगी वांचून नवा बाजार स्थापण्यास यत्न करील त्यावर गुन्ह्याची शाबिती माजिस्ट्रेटासमक्ष झाली ह्मणजे, तो दोनशें रुपये पर्यंत दंडास पात्र होईल.

परवानगीविषयीं अर्जी. २ नवा बाजार स्थापण्याची कोणी मनुष्याची इच्छा असेल त्याणे माजिस्ट्रेटास लेखी अर्ज करावा. त्या अर्जांत खालीं लिहिलेला तपशील असावा ह्मणजे; सदर्हू प्रमाणे नवा बाजार ज्या जागीं स्थापण्याचा इरादा असेल त्या जागेचें नाव, व तो कोणकोणतें दिवशीं भरावयाचा ते दिवस, व अगदीं नजीकचा बाजार ज्या जागीं भरत असेल त्या जागेचें नाव, व तो कोणकोणते दिवशीं भरत असेल ते दिवस, व त्या दोन बाजारांमध्यें किती इंग्लिश मैलांचें अंतर आहे तें, आणि नवा बाजार स्थापण्याचीं कारणें असतील तीं अर्जांत ल्याहावीं.

जाहिरनामा लावणे व सुचना देणे. ३ सदर्हू प्रकारच्या अर्ज पोंचल्यावर माजिस्ट्रेटाने खालीं लिहिलेला मजकूर लिहून जाहिरनामा लावला ह्मणजे, अर्जदाराने लिहिलेजागीं बाजार स्थापण्याची त्याची इच्छा आहे, व तो अमुक अमुक दिवशीं भरण्याचा बेत आहे, त्यास तो बाजार स्थापण्याविषयीं ज्या मनुष्यास हरकत असेल त्याणे जाहिर नाम्याचे तारिखेपासून साहा आठवड्यांत आपली हरकत जाहीर करावी, अशे मजकुराच्या जाहिरनामा लावावा. ज्या गांवांत किंवा शहरांत, किंवा ज्या गांवांजवळ किंवा शहराजवळ नवा बाजार भरण्याचा बेत असेल त्या गांवांतील किंवा शहरांतील लोकांचे सहज दृष्टीस पडे अशे जागेवर जाहिरनामा लावावा. आणि ज्या पोलीस ठाण्याचे हुकुमतींत सदर्हू प्रकारच्या गांव, किंवा शहर असेल त्या पोलीस ठाण्यांत, आणि माजिस्ट्रेटाचे कोर्टांत जाहिरनाम्याची नकल लावावी. ज्या जागीं नवा बाजार स्थापण्याचा बेत असेल त्या जागेपासून चार मैलांचे आंत बाजार भरतो असें, कळून येईल तर तो बाजार ज्या जागीं भरत असेल त्या जागेचे मालकास जाहिरनाम्याचे मजकुराची सुचना माजिस्ट्रेटाने देववावी. जाहिरनाम्याच्या खर्च, व सुचना दिली असल्यास तिच्या खर्च अर्जदाराने दिला पाहिजे.

माजिस्ट्रेटाचा हुकूम. हरकत केली तर. ४ बाजार स्थापण्याच्या बेत असेल तो स्थापण्याविषयीं हरकत जाहिरनाम्यांत, व सुचनेंत लिहिलेले मुदतींत कोणी न केली तर तो स्थापूं देण्याविषयीं माजिस्ट्रेटाने हुकूम करावा. ठरविलेले मुदतींत कोणी हरकत केली तर त्या हरकतीची चौकशी माजिस्ट्रेटाने करावी, व प्रसंगाप्रमाणे आपणास योग्य वाटेल तसा हुकूम करावा.

हा आक्ट ठरण्या पूर्वी दोन वर्षें अगोदर बाजार स्था ५ हा आक्ट ठरल्यानंतर साहा महिन्यांचे आंत खालीं लिहिलेले बाजारांविषयीं ह्मणजे आक्ट ठरण्यापूर्वी दोन वर्षांचे मुदतींत बाजार नवीन स्थापले असतील

पले असतील ते. त्यां विषयीं माजिस्ट्रेटा जवळ कोणी हरकत केली तर, माजिस्ट्रेटाने त्या हरकतींची चौकशी करावी, आणि सदर्हू प्रकारचा नवा बाजार, व पूर्वीपासून असणारा बाजार या दरमियानचें अंतर चार मैलांहून कमी आहे, आणि नवा बाजार स्थापल्याने आसपासचे लोकांस त्रास, किंवा इतर अडचण होत्ये असें कळून येईल तर आपणास जरूर वाटल्यास जा जा दिवशीं सदर्हू प्रकारचा नवा बाजार भरत असेल ते दिवस बदलण्या विषयीं, किंवा आपले नजरेस आल्यास तो बाजार अगदीं बंद करण्याविषयीं हुकूम करण्याच्या अधिकार माजिस्ट्रेटास आहे.

अपील. ६ या आक्टा अन्वयें माजिस्ट्रेटाने केलेले हुकुमावर पोलीस कमिशनराकडे अपील चालेल आणि पोलीस कमिशनराच्या हुकूम आखरचा आहे असें समजावें. त्यांत फेरफार करण्याच्या अधिकार ठिकठिकाणचे सरकारास आहे.

हुकमा प्रमाणे न चालल्या बद्दल दंड. ७ या आक्टा अन्वयें योग्य रितीने हुकूम केला असेल त्याविरुद्ध कोणी मनुष्य चालेल तो, दोनशें रुपये पर्यंत दंडास पात्र होईल.

नवीन मेळे भरतील त्यांस हा आक्ट लागू आहे. ८ नवे बाजार स्थापण्या विषयींचे या आक्टांतील सर्व ठराव नवीन मेळे भरण्यांत येतील त्यांस लागू आहेत असें समजावें.

नंतर प्रेसिडेंट साहेबानी ह्मटलें कीं आनरबल् रीवज्ञ साहेब व आनरबल् जगंनाथ शंकरशेट साहेब व आनरबल् सावनूरकर नवाब साहेब यांची सिलेक्ट कमिटी नेमून त्यां कडे सदर्हू मसुदा सोंपावा व पुढले सभे नंतर दुसरी सभा होईल त्या सभेंत रिपोर्ट करण्या विषयीं त्यांस सांगावें.

ही गोष्ट सर्वांनी कबूल केली.

प्रेसिडेंट साहेब ह्मणाले कीं भागदारी वहिवाट कायम ठेवण्या विषयींचे आक्टाचा मसुदा पहिले वेळीं वाचावा.

नंतर तो मसुदा डेपुटी सेक्रेटरी साहेबानी वाचला तो येणे प्रमाणे.

## मसुदा.

भागदारीची वहिवाट ह्मणून प्राचीन वहिवाट चालत आली आहे तिचा मोड न होऊं देण्याचा उपाय ह्मटला ह्मणजे सुद्दाम कायदाच ठरविला पाहिजे असें बंदेगान आलीनवाब मुस्ताब हजरत आनरबल गवरनर साहेब बाहादूर दर इजलास कौन्सिल यास जाहीर झाले आहे यास्तव कायदे व कानू करण्याचे मुंबई येथील गवरनर साहेबांचे कौन्सिला विषयीं नियम ठरविले आहेत त्या नियमा प्रमाणे खालीं लिहिलेला भागीदारी वहिवाटीच्या बचाव करण्या विषयींचा आक्टाचा मसुदा छापून प्रसिद्ध केला असे.

भागदारी वहिवाट ह्मणून जी वहिवाट मुंबई प्रेसिडेन्सीचे कित्येक जागीं पूर्वापार चालत आली आहे ती खालीं लिहिलेले कारणामुळें कायम राहाणे कठीण आहे ह्मणजे भागदारी गांवाचे भाग केले असतात त्यांतील किंवा त्या भागाचे पोटभाग मंजूर केले असतात त्यांतील घर ठाणे व इमारतीच्या जागा दिवानी कोर्टाचे हुकुमावरून जप्त करून विकण्याची चाल पाडत चालली आहे त्यामुळें कायम

राहाणें कठीण आहे असें नजरेस आलें आहे यास्तव, आणि या प्राचीन वहिवाटीचा नाश दिवानी कोर्टा-च्या योगानें व्हावा हें योग्य नाहीं यास्तव खालीं लिहिल्या प्रमाणें ठरविलें आहे.

१ भागदारी गांवांतील भागाचा पोटभाग मंजूर केला असेल त्या खेरीज त्या भागाचा कोणताही इतर भाग ह्या आक्ट ठरल्या नंतर दिवानी कोर्टाचे हुकुमा वरून जप्त होण्यास किंवा विकला जाण्यास पात्र नाहीं आणि कोणतेंही घरठाण किंवा इमारतीची जागा किंवा ठिकाण सदर्हू प्रकारचे ज्या भागां-त किंवा मंजूर केलेले पोटभागांत असेल तें त्या भागा पासून किंवा पोटभागा पासून वेगळें पडे अशे रितीने सदर्हू प्रकारचे कोर्टाचा हुकूम बजावूं नये.

२ ज्या जिल्यांत भागदारी गांव असेल त्या जिल्ह्याचा कलेक्टर मुकदम्यांतील पक्षकार नसेल तथापि जरूर असेल तेव्हां त्यास खालीं लिहिल्या प्रमाणें करण्याचा अधिकार आहे म्हणजे हा आक्ट ज्या जमिनीस किंवा ठिकाणास लागू असेल ती जमीन किंवा ठिकाण जप्त करण्यास किंवा विक-ण्यास हरकत असेल तीं ज्या दिवानी कोर्टास मुकदम्याचा इनसाफ करण्याचा अखत्यार असेल त्या कोर्टास जाहिर करण्याचा अधिकार कलेक्टरास आहे, नंतर वाजवी व योग्य असेल तसा हुकूम त्या बाबद करण्याचा अधिकार सदर्हू प्रकारचे कोर्टास आहे. आणि ज्या कोर्टाने हुकूम केला असेल त्या कोर्टाचे हुकूमनाम्यावर ज्या रितीने अपील चालतें त्याच रितीने त्या हुकुमावर अपील चालेल.

प्रेसिडेंट साहेब म्हणाले कीं आनरबल रिव्ह्ज साहेब व आनरबल वेस्ट्राप साहेब व आनरबल सेट प्रेमाभाई हेमाभाई यांची सिलेक्ट कमिटी नेमून त्यांकडे सदर्हू मसुदा सोंपावा व पु-ढल सभे नंतर दुसरी सभा होईल त्या सभेंत रिपोर्ट करण्या विषयीं त्यांस सांगावें.

ही गोष्ट सर्वांनी कबूल केली.

नंतर येत्या मार्च महिन्याची तारीख १ ली शनवारचे प्रातःकाळचे ११ वाजे पर्यंत कौन्सिल तहकूब म्हणून प्रेसिडेंट साहेबानी ठरविलें.

बमुजिबे हुकूम बंदेगान आलीनवाब मुस्तताब हजरत
आनरबल गवरनर साहेब बाहादूर दर इजलास कौन्सिल

मुकाम जंजिरे-मुंबई,
तारीख २२ वी फेब्रुआरी सन १८६२.

लिट्लटन आलीओक बेली साहेब,
डेपुटी सेक्रेटारी निसबत सरकार यांची सही.

(True translation)

VENAYEK WASSOODEW,
Oriental Translator to Government.